

## कॅलिडोस्कोप

## मराठी भाषा गौरव दिन २७ फेब्रु वरी २०२१

- **शीर्षक :** मराठी भाषा गौरव दिन
- **आयोजनकर्ता :** यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी
- **दिनांक :** २७ फेब्रुवारी २०२१
- **कार्यक्रम समन्वयक :** सौ. रश्मी महाबळ, श्री. मयुरेश रेडकर
- **कार्यक्रम सल्लागार :** डॉ. विजय ए. जगताप.

**प्रस्तावना:**

मराठी राजभाषा दिन हा जगभरातील मराठी भाषिकांकडून २७ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त प्रसिद्ध मराठी कवी ववष्णूवामन सशरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस हा 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो. १९८७ साली त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. त्यानंतर शासनाने हा दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून जाहीर केला.

**उद्देश:**

१. मराठी भाषेबद्दल आपुलकी व संवेदन निर्माण करणे.

२. सामाजामाद्ध्ये मराठी भाषेविषयी जागरुकता निर्माण करणे व मराठी भाषेला सन्मान प्राप्त करणे.

**कार्यक्रम वर्णन:**

दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजी कविवर्य वी.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीचे औचित्य साधून, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी, सावंतवाडी व सेन्स क्लब, यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी, सावंतवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिन उतसाहात साजरा करण्यात आला. सर्वत्र कोरोन विषाणूच्या रोगाचे सावट असल्याने सदर कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. विजय जगताप सर, स्पंदन संघ प्रमुख डॉ. दत्तात्रय शिनकर, विद्यार्थी आजीवन अद्ध्यायान विभाग प्रमुख सौ. रश्मी महाबळ व श्री. मयुरेश रेडकर उपस्थित होते. मराठी राजभाषा गौरव दिनाचे औचित्य साधून आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालांतर्गत ०१ मार्च २०२१ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. सदर स्पर्धान्माद्ध्ये “मराठी राजभाषेच्या संवर्धनासाठी आवश्यक उपाय योजना” या विषयावर वकृत्व स्पर्धेचे तर “मी वाचलेले अविस्मरणीय मराठी पुस्तक ” या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन केले व विजेत्यांना सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.

